# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

## प्रकरण पहिले

# प्रास्ताविक

कराड हे सातारा जिल्हयातील एक सांस्कृतिक शैक्षणिक व राजकीय दृष्टया महत्वाचे शहर आहे. कराडचे नाव अखिल भारतात गाजले ते म्हणजे आधुनिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व भारताचे माजी उपपंतप्रधान कै. यशवंतराव चव्हाण यांच्यामुळे. यशवंतराव चव्हाण यांची खरी कर्मभूमी कराड शहर होते. अशा महत्वपूर्ण शहरात १८५५ ला नगरपालिकेची स्थापना झाली व या नगरीचा इतिहासात एक महत्वपूर्ण घटना घडली. अशा या कराड नगरपालिकेने केलेल्या नागरी सुखसोयीचा इतिहास या लघुशोध प्रबंधात सांगण्याचा नम्र प्रयत्न मी करीत आहे.

कराड नगरपालिकेने केलेले काम पाहण्यापूर्वी कराड शहराचा प्राचीन व मध्ययुगीन इतिहास मनोरंजक व गौरवशाली आहे, तो या ठिकाणी दिल्यास चुकीचा होणार नाही. तसेच कराड शहराचे भौगोलिक स्थान त्या शहराच्या विकासास कारणीभूत ठरले, म्हणून तो थोडक्यात देत आहे.

कराड हे कृष्णा आणि कोयना या दोन पवित्र नद्यांच्या प्रितिसंगमावर वसलेले प्राचीन शहर आहे.

कृष्णा व कोयना या नद्या सहयाद्री पर्वतातील महाबळेश्वर स्थानानजीक एके ठिकाणी उगम पावून विरुध्द दिशांना वहात जातात आणि कराड नजीक पुन्हा एकरुप होतात. कराडच्या वायव्येकडून संथपणे वाहत येणारी कृष्णा शहराजवळ येताना दक्षिण वाहिनी झाली असून पश्चिमेकडून धावत येणारी कोयना शहरानजीक आल्यावर उत्तराभिमुख होउन कृष्णेस सामोरी जाते. त्या दोघींचा प्रितिसंगम शहराच्या निकट वायव्य दिशेस होऊन कोयना ही कृष्णारुप होते.

अशा प्रकारचा प्रितिसंगम अन्यत्र कोठेही नाही असे म्हणतात. कोयनेच्या भेटीमुळे व्दिगुणित झालेली संगमानंतरची कृष्णा शहराच्या उत्तर बाजूने पूर्वेस वाहते. अखंड जीवन देणा-या या दोन पवित्र नद्यांचे आणि त्यांच्या महापवित्र प्रितिसंगमाचे भक्तिपूर्ण नि -हदयंगम वर्णन 'करहाटक महात्म्य' या ग्रंथात केलेले आहे. ते पुढील प्रमाणे[१]

मध्यदेशे महाक्षेत्र नाम्ना श्रीकरहाटक!
यत्र श्रीकृष्णवेण्याया : क कुदमत्यास्ति
संगमा !!१७!!
ताहश : संगम : पक्षिन जास्ति भूमंडळे
कवचित !
यत्रोत्तरा महालक्ष्मी ब्रम्हविद्भि : सुसेविता !!१०

कृष्णेच्या बरोबर विरुध्द बाजूला कोप-यात हे कराड शहर वसलेले आहे. उत्तर-पश्चिम बाजूला असणारे हे शहर कोयनेपासून ८० ते १०० फुट उंची वरती असून बाजूला नयनरम्य झाडी आहे. उत्तर बाजू साधारणतः कमी उंचीची असून त्या बाजूला शहरापासून नदीपर्यंत घाट जातो. शहरापासून ३ मैलावर उत्तर-पश्चिम बाजूला दुडलेला ६ मैलावर वसंत गड आहे. उत्तर पूर्वेकडे ४ मैलावर टेकडावर दिसणारा सदाशिव गड आहे. त्याच अंतरावर दक्षिण-पूर्वेस १२०० फुट उंचीचे अगाशिव शिखर आहे. उत्तर-पश्चिम, पठारावर बुध्दाची गुहा आहे. कोयना नदीचा परिसर अगाशिवगड सकाळी संध्याकाळी वेळेला नयनरम्य दिसतात. शहराच्या उत्तरेस थोडयाच अंतरावर पाठीमागील बाजूस तत्कालीन अगाशिवगड आहे[२].

कृष्णा कोयनेच्या प्रितिसंगमाने पुनित झालेल्या या कराड नगरीचे नाव संपूर्ण भारतात अनेक दृष्टीने प्रसिध्द आहे. कराड नगरीला तिन्ही बाजूंनी कृष्णा व कोयना

नद्यांनी वेढलेले आहे व एका बाजूला भारताच्या नकाशात ठळकपणे दिसणारा पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग नं. ४ आहे. कृष्णा-कोयना या नद्यांच्यामुळेच कराड नगरी व तिचा सभोवतीचा परिसर सुजलाम सुफलाम झालेला दिसतो. कृष्णा-कोयना नद्यामुळेच कराड परिसरात ३ बलाढय सहकारी साखर कारखाने व एक खाजगी साखर कारखाना मोठया डौलाने उभे आहेत. या सर्वांचा परिणाम म्हणजे कराड नगरी उद्योग व्यवसाय, राजकारण, शिक्षण, संस्कृती, सहकार, कला, राष्ट्रीय कर्तव्य या सर्वच गोष्टीत आघाडीवर आहे.

खरे म्हणजे प्रत्येक विभागाच्या जडणघडणीत व संस्कृतीत बदल असतात. परंतु हे बदल त्या परिसरातील माती व पाणी यावर अवलंबून असतात. आज कृष्णा-कोयनेच्या पाण्याला व मातीला फार महत्व आहे. या धरतीने अनेक आघाडयांवर कराड नगरीचे नाव उच्च पातळीवर नेले आहे. भारताच्या उपपंतप्रधान या पदापर्यंत पोहचवलेले एक भारतीय स्तरावरील नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण हे सुध्दा याच परिसरात लहानाचे मोठे झाले. महाराष्ट्र विधानसभेचे सभापतीपदावर सलग २० वर्षे असलेले रोजगार हमी योजनेचे निर्माते स्वर्गीय वि. स. पागे हे सुध्दा या मातीत मोठे झाले. समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर याच मातीतील, आंतरराष्ट्रीय किर्तीचे मल्ल खाशाबा जाधव याच परिसरातील. तसेच सलग ४० वर्षे कराड नगरीचे नगराध्यक्ष पद भूषविणारे व जागतिक रेकॉर्ड केलेले आ. पी. डी. पाटील हेसुध्दा याच गावचे, विद्वतेचे सागर असलेले खा. दादासाहेब आळतेकर व महाराष्ट्राचे भूषण असलेले समाजभूषण स्वातंत्र्य सैनिक बाबूरावजी गोखले याच परिसरातील अशी कित्येक नवरत्ने या गावाने देशाला भेट दिली आहेत[२].

**कराडचे भौगोलिक स्थान -**

कराड शहर महाराष्ट्र राज्यातील सातारा जिल्हयातील कराड तालुक्याचे ठाणे आहे. कराड हे भौगोलिक दृष्टया मध्यवर्ती पडत असून या ठिकाणाहून चारी दिशांना

पूर्वेस विजापूर दक्षिणेस बेळगाव, उत्तरेस पुण्याकडे आणि कुंभार्ली घाटातून पश्चिम समुद्राकडे जाणारे प्रमुख रस्ते प्राचीन काळापासून अस्तित्वात असल्याने शहरास स्वाभाविक महत्व प्राप्त झालेले आहे[४] .

कराड शहराला मुख्य पाच रस्ते जोडलेले आहेत पुणा-बेंगलोर कराड विजापूर-कराड-मसूर, हे रस्ते डाव्या बाजूने शहराला मिळतात इतर रस्ते कृष्णेच्या उजव्या बाजूने शहरात येतात. १ मैल (चौरस) बाजूने शहराच्या उत्तर पश्चिमेला मातीचा किल्ला आहे[५] .

कराड शहर, १७'' १७' उत्तर अक्षांश आणि ७४'' १६' पूर्व रेखांशावर असून पश्चिम समुद्रापासून अवघ्या ६२ मैलावर २२०० फुट उंचीवर असल्याने या ठिकाणाचे हवामान समशीतोष्ण रहाते. हे ठिकाण मान्सूनच्या टापूत असल्याने त्यास नियमित नि निश्चित पाऊसकाळ लाभलेला आहे. सहयाद्रीच्या पर्वतरांगा उंच नि भक्कम तटांमुळे अतिवृष्टी व वादळी वारे यापासून कराडास नैसर्गिक संरक्षण मिळालेले आहे. शहराच्या आसमंतात दूरवर सपाट नि सुपीक प्रदेश पसरलेला आहे[६].

कराड हे कोकण माण प्रदेशाची उतारपेठ समजतात. कराडचे वार्षिक पर्जन्यमान ७५० मि. मि. आहे. पुणे-बेंगलोर या राष्ट्रीय हमरस्त्यावर पुण्यापासून दक्षिणेस १०१ मैलावर व कोल्हापूर पासून उत्तरेस ४६ मैलावर कराड वसले आहे. जुन्या शहराची दक्षिणोत्तर लांबी सुमारे दीड मैल असून पूर्व-पश्चिम रुंदी १/२ मैल आहे. पश्चिमेकडून व पूर्वेकडून शहरात शिरतेवेळी कोयनेवर व कृष्णेवर दोन्ही पूल लागतात. पुणे बेंगलोर रस्त्यावरुन कराडमध्ये शिरताना कोयना नदीवर असलेला लोखंडी पूल १८६२ साली बांधला आहे. तसेच कराड-विजापूर रस्त्यावरचा सिमेंट कॉंक्रीटचा पूल १९३९ साली बांधला आहे. तसेच कराड पासून पश्चिमेस १॥ मैलावर कराड-चिपळूण रस्त्यालगत छोटासा विमानतळ सन १९६५ मध्ये बांधला आहे. कराड शहराच्या उत्तरेस कृष्णा नदीचे पलिकडे तीन मैलावर कराड रेल्वे स्टेशन आहे. तसेच कृष्णा नदीचे उत्तरेस कराड

मसूर रस्त्यावर दोन मैल अंतरावर इंजिनिअरिंग कॉलेज, पॉलिटेक्निक इंडस्ट्रिअल ट्रेनिंग इन्स्टिटयूट, सायन्स कॉलेज, गाडगे महाराज कॉलेज वगैरे विश्वविद्यालयाचा परिसर पसरलेला आहे. म्हणून या परिसरास विद्यानगर म्हणून ओळखले जाते.

कृष्णा काठची जमीन महाराष्ट्रात सर्वात चांगली व सुपीक समजली जाते. कराडच्या आसमंतात दूरवर काळी व सुपीक जमीन असून हया सहयाद्रीच्या खो-यात संपन्न समजली जाते. प्रितिसंगमावरुन १॥ मैल उत्तरेस कृष्णा नदीवर खोडशी रम्य धरण आहे. त्यावर ३५ मैल लांबीचा कॅनॅल आहे. त्यामुळे कराड तालुक्याच्या दक्षिण भागात पहिल्या पासून बागाईत मोठया प्रमाणावर आहे".

**कराड नावाची उत्पत्ती -**

कराड हे नाव कसे पडले हा मोठा वादग्रस्त मुद्दा आहे. प्राचीन शिलालेखातून, ताम्रपटातून अीण महाभारत इ. महाकाव्यातून या शहराच्या नावाची करहाटक, करहाट, करहाकट, करहाकडक अशी रुपे आलेली आहेत. भरुतच्या लेखात करहकट व कुडयाच्या लेण्यातील लेखात (इ.स. पूर्वी २०० ते इ. स. नंतर १००) करहाकडक अशी नावे आलेली आहेत. कट याचा अर्थ कंबरपट्टा व नंतर लगतची दरी, सपाट प्रदेश गाव असा होतो. करहाकड म्हणजे करहेच्या लगतची दरी किंवा सपाट मुलुख कदाचित पुरातन काळी कोयनेस व कृष्णेस 'केरा'च संबोधत असलेस नवल नाही. करेचे प्राचीन नाव करहा अथवा क-हा ही कदाचित असेल करहा हे त्यावेळचे प्राकृत रुप असेल.

केरा, करहा, क-हा याचा कट यावरुन त्या शहराचे कराड नाव रुढ होते असे संभवनीय आहे.

दुसरी उत्पत्ती अशी आहे. 'करहा' नदीच्या काठचे 'हाटक' म्हणजे सोने. हट बाजार हटचे प्राकृत रुप अर्थात हाट होईल. करहाच्या क-हेच्या ठिकाणी सोन-

सोन्यासारखे गाव किंवा बाजाराचे गाव म्हणजेच क-हा नदीच्या काठचे बाजाराचे गाव म्हणजे कराड असा अर्थ य. रा. गुप्ते यांनी केला आहे. तथापि क-हा आहार म्हणजे क-हा नदीच्या काठचा आहाट म्हणजे प्रांत असा होतो. कोयना नदीचे पूर्वीचे नाव क-हा असावे[८].

हिंदु धार्मिक कल्पनेप्रमाणे 'करहाटक' या नावाची उत्पत्ती निराळी आहे. या क्षेत्रात श्रीकर नावाचा श्री शंकराचा एक भक्त होता. श्री शंकराने प्रसन्न होऊन श्रीकराच्या इच्छेप्रमाणे वर दिला की तुझ्या व माझ्या नावानी हे क्षेत्र (कराड) संबोधिले जाईल. तो वर म्हणजे श्रीकर + हाटकेश यातील सुखातीची व अखेरची अक्षरे काळाच्या ओघात गळून 'करहाटक' असे या शहराचे नाव रुढ झाले. श्रीकराची ही कथा 'श्रीकृष्णा महात्म्य या ग्रंथात आहे'. 'श्रीकृष्णा महात्म्य' स्कंद पुराणान्तर्गत असून दहावे शतक हा त्याचा रचना काळ मानला जातो. त्यापूर्वी कित्येक शतकापासून करहाटक हे नाव प्रचारात होते. ही वस्तुस्थिती लक्षात घेउनही वरील उत्पत्ती काहीच तथ्यांश नाही. परंतु परंपरेने चालत आलेल्या कल्पना समजुती अल्पांशाने का होईना वस्तुस्थिती निदर्शक असतात[९].

**प्राचीन कालखंड -**

प्रसिध्द अर्कालॉजिस्ट एस. बी. देव यांनी महाराष्ट्राची प्रगैतिहासिक संस्कृती निदर्शनास आणली. कृष्णा, गोदावरी, वैनगंगा, तापी, पूर्णा, पेनगंगा, भिमा, मुळा, मुठा इ. नदयांच्या परिस्थितीवरुन प्रागैतिहासिक हत्या-यांचे पुरावे मिळतात. यावरुन पाषाण युगीन मानवी वस्ती त्या ठिकाणी होती.

महाराष्ट्रात पाषाणयुगीन हत्यारे मुळा, मुठा, भिमा, कृष्णा, पूर्णा, वैनगंगा नदीकाठी सापडली[१०].

**महाकाव्य आणि करहाटक -**

महाभारताच्या सभापर्वाच्या बत्तिसाव्या अध्यायात त्याच्या दक्षिण दिग्विजयात कराडचा उल्लेख आला आहे. महाभारतातील बुध्दिमान सहदेवाने तिमिज्जिन यास वश करुन एकपाद केरळ, वनवासी, नगरी संजयन्ती व ज्यात पाखण्डवादी लोक आहेत असे करहाटक (कराड) ही आपल्या दुतांकडून ताब्यात आणली व त्यांच्याकडून कर वसूल केला[११].

**मौर्य कालखंड -**

इ. स. पूर्व तिस-या ते दुस-या शतकात कराड सम्राट अशोकाच्या साम्राज्यात मोडत असले पाहिजे.

बौध्द धर्मास सम्राट अशोकाच्या कारकिर्दीत (इ.स. पूर्व २७३ ते इ. स. पूर्व २३२) राजाश्रय मिळाल्याने त्याचा प्रसार या आणि बाहेरच्या देशातही झपाटयाने झाला. सम्राट अशोकाच्या साम्राज्याचा विस्तार कराडच्याही पलिकडे दक्षिणेस म्हैसूर पर्यंत होता हा इतिहास आहे. इ. स. पूर्व तिस-या शतकापासून इ. स. तिस-या शतकापर्यंत कराड हे बौध्द धर्मीयांचे प्रमुख केंद्र होते.

**अगाशिवाची लेणी -**

कराड शहराच्या ईशान्येस एक मैलावर अगाशिवाचा डोंगर आहे. माथ्यावर शिवाचे देवालय आहे. अगाशिवाचे डोंगरात बौध्दभिक्षूकरिता खोदलेली पुरातन लेणी आहेत. या लेण्यांची संख्या ५४ असून त्यापैकी बावीस लेणी कोयना नदीच्या बाजूस एकोणीस बहिरवद-या आणि तेवीस जखीणवाडी कडील बाजूस आहेत.

कराडची ही लेणी इ. स. पूर्व २५० ते इ. स. नंतर २०० पर्यंतच्या काळातील असावीत असे विव्दानांचे मत आहे. ही सर्व लेणी बौध्द धर्मातील हीनयान पंथाच्या पूर्व

काळातील आहेत. या पंथात बुध्दाची प्रत्यक्ष मूर्ती पूजीत नसत. दागोबा बुध्दाचा निदर्शक मानला जाई. धर्माची खूण चक्र आणि सिंह हा बौध्द धर्मीय संघाचा द्योतक समजला जात असे. या त्रयीस बौध्दधर्माचे 'त्रिरत्न' संबोधितात. ही चिन्हे कराडच्या लेण्यातून दिसून येतात.

या भागावर बौध्द धर्माची पकड सुमारे पाचव्या शतकापासून ढिली होत गेल्याचे दिसते. शुध्द बौध्द तत्वाचा लोप होत जाऊन बुध्दाला विष्णूचा अवतार मानन्यात येऊ लागले. बौध्द धर्माचे प्राचीन अवशेष हिंदु धर्माच्या अवशेषात मोडू लागले. अगाशिवाच्या लेण्यांना पांडवाची लेणी म्हण्याचा परिपाठ पडला त्या लेण्यातील बुध्दाची प्रतिमा म्हणजे 'दागोबा' याला भीमाची गदा बनविण्यात आले[१२].

**भरुत येथील कराडसंबंधी शिलालेख -**

मध्य प्रदेशातील जबलपूर शेजारील भरुत येथील शिलालेखात आणि कुलाबा जिल्हयात असलेल्या कुडयाचे लेण्यातील लेखात कराडच्या धनिक बौध्द धर्मीय यात्रेकरुंनी तेथील लेणी बांधण्यासाठी देणग्या दिल्याचा उल्लेख आहे. भरुत व कुडयाचे लेण्यातील लेख इ. स. पूर्व ३०० ते २०० च्या दरम्यानचे आहेत असे विव्दानाचे मत आहे. ते लेख आजही कराडच्या प्राचीनत्वाची व वैभवाची ग्वाही देतात.

लेखांक २१ - हा स्तंभ करहकटचा आर्यभूतक याची देणगी

लेखांक २४ - हा स्तंभ करहकटचा राहणारा समिक याची देणगी

लेखांक ४३ - 'करहकट' उतरगिधिकस याची देणगी

लेखांक ६७ - करहकटच्या नैगमाची अथवा करहकट शहराची देणगी

लेखांक ७ - करहकट निवासीनीची देणगी

**कुडयाचे लेण्यातील लेख -**

लेखांक १८ - करहाकडचा लोखंडाचा व्यापारी महिक याचा दानधर्म

वरील लेखावरुन कराड हे सधन लोकांचे शहर आणि व्यापाराचे केंद्र असल्याचे दिसते. त्या काळी या ठिकाणी लोखंडाचा व्यापार मोठया प्रमाणावर चालत असावा[१३].

**इ. स. पूर्व ४ थे व ३ -या शतकातील कराड -**

ताम्रपाषाण युगातील वस्ती नंतर उगवलेले दाट जंगल साफ करुन मौर्य सातवहन काळात अथवा इ. स. पूर्व तिस-या शतकात महाराष्ट्रात मोठया प्रमाणावर पुन्हा वस्ती झाली. याचा पुरावा नासिक, पैठण, प्रकाशे, सोपारा, तेर, नेवासे, कोल्हापूर आणि कराड या ठिकाणच्या उत्खननात उजेडात आला आहे[१४].

लोहयुगात भारतात आणि महाराष्ट्रात प्राचीन ऐतिहासिक काळातील नागरी संस्कृतीचा उदय झाला. पैठण, नासिक, कोल्हापूर आणि कराड ही सांस्कृतिक केंद्रे ठरली[१५].

उत्तर भारतात प्रचलीत असलेली मौर्यकालीन खापरे बौध्द भिक्षुनी भ्रमंतीमध्ये महाराष्ट्रात आणली अशी खापरे कराड येथेही सापडतात. तसेच हस्तीदंत, फासे हत्ती सापडली[१६].

**सातवाहन कालखंड (इ. स. पूर्व २३५ ते इ. स. २२५) -**

महाराष्ट्राचे पहिले महत्वाचे राजघराणे म्हणून सातवाहन घराणे होऊन गेले. सातवाहन हे पूर्वी मौर्यांचे मांडलिक होते. नंतर त्यांनी स्वतंत्र राजे म्हणून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र व मध्यप्रदेशावर राज्य केले. त्यांचा कालखंड जवळ जवळ ४६० वर्षाचा असून एकंदर ३० राजे होऊन गेले. सातवाहन काळात महाराष्ट्रात बौध्द धर्माचा प्रसार

झालेला दिसतो व काही बौध्दधर्माच्या गुंफा दिसतात. कराड जवळ सातवाहकालीन ३० बौध्द धर्माच्या गुंफा व काही शिलालेख सापडतात[१७].

कराडचा उल्लेख पहिल्यांदा एका शिलालेखात आला असून त्या शिलालेखाचा कालखंड इ. स. पूर्व २०० ते इ.स. १०० असून तो शिलालेख मध्यप्रदेशात जबलपूर जवळ आहे[१८].

डॉ. बी. जी. गोखले यांनी बुध्दीजम इन महाराष्ट्र अे हिस्ट्री ("Buddhism in Maharashtra A History") हा प्रसिध्द संशोधनात्मक ग्रंथ लिहिला असून त्यात कराड शहराचे महत्व पुढीलप्रमाणे कथन केले आहे. "कराड" हे प्राचीन शहर असून तिथले दानशूर व्यक्तींनी महाराष्ट्रातील अनेक ठिकाणी देणग्या दिलेल्या दिसतात. म्हणून कुडा (अलिबाग, जि. कुलाबा व भरुत मध्यप्रदेश) या ठिकाणातील शिलालेखात कराडचा उल्लेख दिसतो. इ. स. ९० ते इ. स. १५० च्या कालखंडात कराड जवळ ६३ बौध्दगुंफा कोरलेल्या आहेत आणि हया गुंफेत बौध्द, साधू व साधवी रहात असून बौध्द धर्माचा अभ्यास त्या ठिकाणी केला जात होता. कराड हे इ. स. पहिल्या शतकात बौध्दधर्मांचे एक प्रगत केंद्र दिसते. तसेच व्यापा-याच्या दृष्टिने महत्वाचे केंद्र होते. सातवाहनांची राजधानी पैठण व दुसरे महत्वाचे ठिकाण कल्याण व उज्जैणी हे कराडशी व्यापारी मार्गाने जोडलेले दिसते. तगर, जुन्नर, करहाटक, कोल्हापूर, नेवासा इ. प्रगत व्यापारी केंद्रे सातवाहन काळात दिसतात[१९].

**क्षत्रप -**

इ. स. तिस-या शतकात कराडवर 'क्षत्रप' राजाचे राज्य होते. ते बौध्द धर्मीय होते. विजयसेन, दामजदश्री, तिसरा रुद्रसेन, दुसरा विश्वसिंह भर्तृदामन व विश्वसेन या महाक्षत्रपांची नाणी कराडात टिळक हायस्कूलच्या बाजूस व नजीकच्या गावात विपुल प्रमाणात सापडली आहेत.

**भोज -**

तिस-या शतकानंतर काही काळ कराड कुंतल देशात मोडत असावे कुंतल याचेच कुंडल हे अपभ्रष्ट रुप दिसते. कुंतल देशावर वाकाटकाचा म्हणजे भोज या राजघराण्याचा अंमल होता.

**चालूक्य-बदामी -**

इ. स. ५५० ते ७५० या काळात कराडवर चालुक्यांचे राज्य होते.

**राष्ट्रकुट -**

इ. स. ७५० ते ९७३ पर्यंत कराड राष्ट्रकुटाच्या अंमलाखाली होते. या घराण्यातील दुसरा दन्तीदुर्ग याच्या सन ७५३ च्या ताम्रपटात 'करहाटक' असा या गावाचा उल्लेख आहे. याच कुलातील तिस-या गोविंदाच्या ८१० च्या ताम्रपटात 'करहड' च्या व्यासभट्ट नावाच्या ब्राम्हणास देणगी दिल्याचा उल्लेख आहे. राष्ट्रकुट घराण्यातील तिस-या कृष्ण राजाच्या ता. ९ मार्च, ७५९ च्या ताम्रपटात करहाटच्या ईशानशिवाचा शिष्य गगनशिव यास दानपत्र दिलेले आहे[२०].

कराड येथे सापडलेल्या व कै. सर रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी 'एपिग्राफिया इंडिका' या त्रैमासिकात संपादिलेल्या राष्ट्रकुट घराण्यातील तिस-या कृष्णराजाच्या एका ताम्रपटात कराडचे नाव 'करहाट' असे दिले आहे[२१].

पहिल्या अमोघवर्ष सम्राटाच्या सजानच्या ताम्रशासनात करहड शहराहून दूर गेलेल्या बह्च शाखेच्या नरसिंह दीक्षित, रक्षादित्य क्रमवित त्रिविक्रम - केशव गहियसहास या चार ब्राम्हणांची नावे दिली आहेत. यावरुन कराड गावातील ब्राम्हणांची विव्दानांत गणना होई.[२२]

**सिंद -**

सिंद वंशातील राजाने येथील राजास हाकलून देऊन स्वतःच्या बाहुबलावर मुलुख पादाक्रांत केला आणि चार हजार शहरे व गावे असलेल्या करहाटक प्रांताच्या पुष्कळ जिल्हयावर राज्य केले असा उल्लेख हरीहर येथील लेखात आला आहे''.

**शिलाहार -**

इ. स. अकराव्या - बाराव्या शतकात कराड, वाळवे, मिरज, कोकण भागावर शिलाहारांच्या एका शाखेचा अंमल होता. त्या शाखेची कराड ही राजधानी होती. टिळक हायस्कूलकडील बाजू प्राचीन असून त्या बाजूस लागलेले जुने पाय शिलाहारांच्या राजवाडयाचे असावेत. असा डॉ. दे. रा. भांडारकर यांचा अंदाज आहे.

या कुलातील मारसिंह राजाच्या ताम्रपटात सन (१०५८) कराडचे नाव 'करहाट' असे आले आहे. या राजास चंद्रलेखा नावाची रुपवती मुलगी होती. तिचे स्वयंवर पश्चिम चालुक्य सम्राट सहावा विक्रमादित्य याचे बरोबर करहाटक शहरी झाले. विक्रमादित्याच्या दरबाराची कवी काश्मिरी पंडित विद्यापति भिल्हण याने 'विक्रमांकदेव' चरित्रात त्या स्वयंवराचे रसभरीत वर्णन केले. चंद्रलेखेच्या स्वयंवरास दूरदूरने राजे आले होते. यावरुन कराड भरभराटीचे शहर असावे.

विजयादित्य हा शिलाहार या शाखेतील सर्वात प्रसिध्द राजा त्याने इ. स. ११४२ ते ११५४ लेख उपलब्ध आहेत. त्याने ठाण्याच्या शिलाहार राजास राज्य परत मिळवण्यासाठी मदत केली. विजयादित्याने करहाटक ब्राम्हण नरसिंह भट सत्यवादी (रियासतकार गोविंदराव सरदेसाईचे पूर्वज) यास कोकणातील संगमनेर गाव इनाम दिला.

रा. ब. वैद्यांच्या मते शिलाहारांची राजधानी कराड होती. तथापि डॉ. फलीट म्हणतात की क-हाड त्याची राजधानी असल्याचा उल्लेख कोठेही नाही. पण बिल्हणाने

'करहाटपती' हा शब्द योजिला आहे. तेंव्हा मारसिंहाचे राज्य करहाटावर होते यात शंका नाही[२४].

### यादवकालीन कराड -

शिलाहार कुलातील शेवटचा राजा दुसरा भोज याची सत्ता बरीच वाढली होती. परंतु बाराव्या शतकाच्या सुरवातीस देवगिरीच्या यादव कुलातील सम्राट सिंघण याने त्याचा मुलुख पादाक्रांत करुन आपल्या साम्राज्यात सामील केला. यादव घराण्याचे राज्य महाराष्ट्रावर १३ व्या शतकाच्या अखेरीपर्यंत होते[२५].

### कराड एक व्यापारी केंद्र -

इ. स. आधीचे एक शतक आणि त्यानंतरची तीन शतके अशा चारशे वर्षाच्या काळात महाराष्ट्रातील नागरी संस्कृतीची आर्थिक भरभराट झालेली दिसते. भारतातून कापड, मिरी इ. वस्तू निर्यात केल्या जाऊन त्याच्या मोबदल्यात उंची कडक रोमन मद्य, काच सामान, रोमन पुतळया इ. वस्तू इकडे येऊ लागल्या. महाराष्ट्राच्या आसपास पश्चिम किनारपट्टीवर भरकच्छ कल्याण यासारखी बंदरे नाला, सोपारा, नाशिक, कराड, जुन्नर, कोल्हापूर व्यापारी आणि धार्मिक स्थळे आहेत[२६].

तसेच क्षत्रपाची नाणी कराड मंगळावर पेठेत सापडली आहेत[२७].

### मध्ययुगीन कालखंड -

#### बहामणी कालखंड -

चौदाव्या शतकाच्या सुरवातीस दक्षिणेवर दिल्लीच्या मोगल बादशहाच्या स्वा-या सुरु झाल्या. देवगिरीच्या यादवाचा पराभव झाल्यानंतर इ. स. १३१८ पासून दक्षिणेस मुसलमानी अंमल सुरु झाला. इ. स. १३४६ मध्ये मोगल बादशहाच्या सुभेदारांनी मोठया प्रमाणावर लुटालुट व नासधूस केल्यामुळे दक्षिणेत त्या सत्तेविरुध्द बंड झाले. त्याचे

नेतृत्व हसन गंगू बहामनी यांचेकडे होते. त्याने मोगली सत्ता झुगारुन देऊन बहामणी राज्याची स्थापना केली.

पुढे महंमद गवाणच्या मृत्युनंतर बहामणी साम्राज्याचे पाच तुकडे होऊन त्याच्या पाच शाहया निर्माण झाल्या. मुसलमानी आमदानीत कराडास 'कलहराबाद' म्हणत.

सन १३९६ मध्ये महाराष्ट्रात फार मोठा दुष्काळ पडला, तो बारा वर्षे राहिला. त्यामुळे कराड प्रदेश उध्वस्त झाला. वस्ती विरळ झाली यावेळी विजयनगरहून दादो नरसिंह अथर्ववेदी मालंजन गोत्री पा॥ कराडास आला. त्याचे उपनाव काळे होते. त्याने बिदरच्या बादशहा कडून परवानगी घेऊन पुन्हा वसाहत केली व मुलकी कारभारासाठी कराड परगणा करुन त्यात बावन्न गावे सामील केली".

**अदिलशाही -**

बहामणी राज्याच्या पाच पादशाहयांपैकी विजापूरच्या अदिलशाही अंमलाखाली इ. स. १४९७ च्या सुमारास कराड आले. विजापूरचा नायब सुभेदार कराडास रहात असे.

अदिलशाहीत कराड भागाचा मोकासा एकलासखानाकडे काही वर्षे होता. पुढे तो त्याच्या मुलास मिळाला, नंतर आसतखान लाहारी हा मोकासाई खान होता. नंतर मोकासा अमानत होऊन आलमखान व मुस्तफाखान यास कराड प्रांत जहांगीर मिळाला.

**भुईकोट किल्ला -**

कराड शहराच्या वायव्य कोप-यात भुईकोट किल्ला आहे. किल्याच्या चहोबाजूस आठ फुट रुंदीचा भक्कम तट आहे. एकूण दहा बुरुज आहेत. विजापूरच्या अदिलशाहीच्या ताब्यात हा किल्ला होता. पुढे शिवाजी राजांच्या ताब्यात गेला. १७३१ पासून पंतप्रतिनिधीनी आपली राजधानी भुईकोट किल्ल्यात ठेवली".

**इतिहास प्रसिध्द मनोरे व मशिदी -**

विजापूरचा बादशहा पहिला अली अदिलशहा याच्या हुकुमावरुन सुभेदार इब्राहिम कामीलखान याच्या देखरेखीखाली अल्ली-बिन-महंमद असफहानी यांनी कराडमध्ये दोन मनोरे बांधले त्याची उंची १०६ फुट आहे. हे बांधकाम १५७६ पूर्ण झाले. त्याच्या जवळ जामे मशिद असून त्यात अरबी भाषेत नऊ लेख आहेत".

**खाँजा खिजर अल्लीसाहेब दर्गा -**

चाँद बिबीच्या काळात कराडमध्ये अठरा मशिदी होत्या. तसेच चाँदबिबीने मुर्तजा अली दर्ग्यावर घुमटावर घुमट चढविला. तसेच खाँजा खिजर दर्गा ही मुस्लीम वास्तू आहे. त्याचे हिंदु ही भक्त आहेत".

**मराठी कालखंड -**

कराड प्रांतातील बावीस गावाची देशमुखी शहाजीस अदिलाशहाने रणदुल्ला खानाचे हाताखाली सन १६३८-३९ मोहिमेत उत्तम काम केल्याबद्दल दिली. शहाजीने अदिलशाही त्याग करताच ती झुंझाराव घाडगे यास मिळाली व १६५३ साली बाजी घोरपडयास बहाल केली.

कोल्हापूरकर संभाजी छत्रपतीच्या 'विविध ज्ञान विस्तारातच' दिलेल्या अस्सल सनदेवरुन कराडचा विश्वनाथभट गिजरे शिवछत्रपतीच्या तीर्थोपाध्याय होता हे सिध्द झाले आहे.

त्याच्या काळात कराड कधी त्याच्याकडे तर कधी अदिलशाही अंमलाखाली चाले. तरी त्याच्या मृत्यूच्या वेळी कराड प्रांत त्याच्या ताब्यात होता.

थोरल्या शिवछत्रतींच्या मृत्युनंतर त्यांचा सेनापती हंबीरराव मोहिते याने कराडच्या आसपासचे रस्ते संभाजी छत्रपतीच्या उलट रोखून धरिले होते.

थोरल्या राजाराम छत्रपतीच्या कारकिर्दीत ते जिंजीकडे असता रामचंद्रपंत अमात्य कराड वगैरे प्रांताचा बंदोबस्त वसंतगड किल्ल्यावरुन पहात असे व तेथून सनदा देत असे.

शिवाजी महाराजांनी सन १६४६ साली तोरणा किल्ला घेऊन स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली व पुढे एकामागून एक अनेक महत्वाचे किल्ले हस्तगत केले. सन १६६१ साली त्यांनी विजापूरकरांचा पन्हाळा किल्ला घेऊ न या प्रांतावर आपला अंमल बसवला. शिवाजी महाराजांच्या वाढत्या हालचालींना पायबंद घालण्याच्या हेतूने सन १६६१ च्या जानेवारीत विजापूरचा दुसरा अल्ली अदिलशहा स्वतः सैन्य घेऊन कराडपर्यंत आला. त्याचा व महाराजांचा सेनापती मोरोपंत पिंगळे यांच्या सैन्याचा सामना कराडास हल्ली इदगा असलेल्या माळावर झाला.

दिल्लीचा मोगल बादशहा औरंगजेब याने आपल्या दक्षिणच्या स्वारीत सन १६९० साली मराठयांचा राजधानीचा किल्ला रायगड घेतला. तेंव्हापासून सन १७०७ पर्यंत मराठे व मोगल यांच्यात सारखे युध्द सुरु होते. त्या काळात कराड कधी मोगलांच्या तर कधी मराठयांच्या ताब्यात असे या स्वातंत्र्य युध्दात कराड प्रांतातून मराठी सैन्यास रसद पोहोचविण्याचे काम परशुराम त्रिंबक प्रतिनिधीचे बंधू माधवराव करीत होते.

सन १७०७ साली औरंगजेब मृत्युपावल्यावर त्याच्या कैदेतून संभाजीचा मुलगा शाहू याची सुटका झाली. त्यावेळी राजाराम महाराजांची बायको ताराबाई आपला मुलगा शिवाजी याचेकरिता सातारहून मराठी राज्याचा कारभार पहात होती. शाहूस राज्य मिळू नये असे प्रयत्न तिने चालविले मराठा मंडळात दुफळी झाली. इतर काही सरदारांबरोबर परशुरामपंत प्रतिनिधीस शाहूने आपल्या बाजूस वळविले. परशुरामपंत लढवय्या व

मुत्सद्दी असल्याने त्यास १७१० साली जेव्हा प्रतिनिधी पद दिले त्यावेळी दिलेल्या सनदेत शाहू महाराजांनी कराड प्रांत प्रतिनिधीस दिला.

सातारा काबीज करुन शाहू महाराज साताराच्या गादीवर बसल्यामुळे ताराबाईने आपला मुलगा शिवाजी याच्यासाठी कोल्हापूर ही स्वतंत्र राजधानी केली. १७१४ साली राजारामाची दुसरी बायको राजसबाई हिचा मुलगा संभाजी कोल्हापूरचे गादीवर आला. सातारा व कोल्हापूर येथील छत्रपतीमध्ये लढाया सुरु झाल्या. सन १७३० मध्ये वारणा काठावर श्रीपतराव प्रतिनिधीने संभाजीचा पराभव केल्यावर उभय छत्रपतींमध्ये तह होऊन त्याची १७३१ साली कराड मुक्कामी मोठया समारंभाने भेट झाली. एका अंबारीत बसून दोघांची बोलणी झाली. त्योवळी सुवर्ण व रौप्य पुष्पवर्षाव करणेत आला असे या भेटीचे वर्णन आहे. या तहाने मराठी राज्यांपैकी वारणेच्या दक्षिणेचा मुलूख कोल्हापूराकडे ठेवणेत आला आणि कराड वगैरे प्रांत श्रीपतराव पंत प्रतिनिधीकडे ठेवण्यात आले. प्रतिनिधीनी आपली राजधानी कराड येथे भुईकोट किल्ल्यात ठेविली आणि भोवतालचे सदाशिवगड, वसंतगड, मच्छिंद्रगड हे डोंगरी किल्ले आपल्या ताब्यात ठेवून राजधानीच्या संरक्षणाची सोय केली.

श्रीनिवास परशुराम उर्फ श्रीपतराव प्रतिनिधी नेहमी साता-यासच शाहू महाराजांच्याकडे असत. प्रतिनिधी ज्यावेळी लढाईच्या कामगिरीवर असत त्यावेळी त्याचे काम पहाण्यास छत्रपतींकडून मुखत्यार नेमले जात त्यांना मुतालीक म्हणत. मुतालिकांचा विस्तृत वाडा कोटाच्या पूर्व अंगास आहे. कराड हे छत्रपतींच्या प्रतिनिधीचे राजधानीचे गाव असल्याने मुख्य सैन्याचा तळ कराडास असे. त्या काळी कराड हे मराठी राज्यातील घडामोंडीचे केंद्र बनले होते.

कराड येथे राजधानी स्थापन केल्यावर श्रीपतराव प्रतिनिधींनी प्रथम पेठांची आखणी करुन पेठांना सात वारांची नावे दिली आणि आपल्या वडिलांच्या नावे परशुरामपूर नावाची पेठ बसविली. वाणी, उदमी, व्यापारी यांना उत्तेजन देउन शेटे, महाजन, औटे यांची व्यापाराचे उत्तेजनार्थ योजना केली. यावेळी कराड क्षेत्र मोडकळीस आले होते. श्रीपतरावानीं त्यांचा जीर्णोध्दार केला, देवस्थानास इनामे दिली, वेदविद्येस उत्तेजन दिले. कराड शहरातील ग्रामोपाध्ये, गिजरे व आराणके या वैदिक घराण्यांतील विव्दान पुरुषांना संकेश्वर श्रीमद्‌जगतगुरु, श्री शंकराचार्य यांचे पीठावर अधिष्ठित होण्याचा मान मिळाला.

**श्रीपतराव प्रतिनिधीनंतर अनुक्रमे -**

जगज्जीवनराव
भवानराव
गंगाधर
भगवंतराव त्र्यंबक परशुराम श्रीनिवास
श्रीनिवास
परशुराम

यांना प्रतिनिधीपद मिळाले. श्रीनिवास परशुराम यांच्या काळात कराड प्रतिनिधीची राजधानी सन १८५५ साली औंध येथे हलविण्यात आली. आणि त्या साली कराडचा मोबदला घेऊन हे शहर इंग्रज सरकारच्या अंमलाखाली आले आणि त्याच साली सप्टेंबर महिन्यात १५ तारखेस (१८५५) कराड नगरपालिकेची स्थापना झाली".

अशा प्रकारे कराड हे महाराष्ट्रातील प्रसिध्द छोटे बहुरुपी तालुक्याचे ठिकाण आहे. तरी पण प्राचीन काळापासून ते अनेक कारणांनी प्रसिध्द आहे. त्याच्या वैशिष्टयपूर्ण स्थानामुळे ते अभ्यासनीय आहे.

धार्मिक दृष्टया कृष्णा कोयना काठचे एक प्राचीन तीर्थक्षेत्र आहे. प्रितिसंगम असलेले हे महत्वाचे शहर आहे. आज विसाव्या शतकातही सांस्कृतिक धार्मिक ऐतिहासिक राजकीय सर्व च क्षेत्रात त्याचे अष्टपैलूत्व उठून दिसणारे आहे. अशा या शहरात नगरपालिकेची स्थापना होऊन नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या बाबतीत महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकेत ते अग्रेसर आहे.

इ. स. १८१८ ला पेशवाईचा शेवट झाला व इंग्रजांनी साता-याला प्रतापसिंह महाराजांना छत्रपती म्हणून घोषित केले. नवीन सातारा राज्य अस्तित्वात आले. इंग्रजांनी ब्रिटिश अधिकारी नेमले. छत्रपती नामधारी होता. ग्रँडडफ हा ब्रिटिश अधिकारी साता-याला काही काळ राहिला. ब्रिटिशांचे मांडलिक म्हणून सातारा राज्य १८१८ ते १८४८ पर्यंत अस्तित्वात होते. १८३९ ला छत्रपती प्रतापसिंहाना इंग्रजांनी पदच्च्युत केले आणि त्यानंतर सातारा गादीवर आलेल्या शेवटचा छत्रपती शहाजी उर्फ आप्पासाहेब त्याला औरसपुत्र नसल्याने भारताचे गव्हर्नर जनरल डलहौसी याने दत्तकास नामंजूर करुन १८४८ ला नवनिर्मित सातारा राज्य खालसा केले व सातारा हा मुंबई प्रांतातला एक जिल्हा म्हणून अस्तित्वात आला[११]. जिल्हाधिकारी म्हणून नवीन इंग्रजी अधिका-यांनी सातारा जिल्हयाची सुत्रे घेतली. सातारा जिल्हयात एकंदर ११ उपविभाग १८५६ अस्तित्वात आले ते पुढील प्रमाणे-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | विजापूर | २. | जावळी |
| ३. | कराड | ४. | खानापूर |
| ५. | खटाव | ६. | कोरेगाव |

| | | | |
|---|---|---|---|
| ७. | पंढरपूर | ८. | सातारा |
| ९. | तासगाव | १०. | वाळवा |
| ११. | वाई | | |

अशा रीतीने कराड हा सातारा जिल्हयाचा एक उपविभाग व पुढे तालुका म्हणून अस्तित्वात आला आणि ब्रिटिशांच्या विकेंद्रीकरणाच्या धोरणास अनुसरुन मुंबई प्रांतात नगरपालिका अस्तित्वात येऊ लागल्या. त्यानुसार कराड नगरपालिकेची स्थापना १८५५ साली झाली व कराड शहरातील नागरिकांच्या सुखसोईसाठी आरोग्य व शिक्षणासाठी हया नगरपालिकेने मोलाची कामगिरी केली व क-हाड शहराचा विकास कसा होत गेला याचा वृत्तांत पुढील प्रकरणात देत आहे.

# संदर्भ


१. मैदानी व मर्दानी सामना समिती, कराड रौप्य महोत्सव स्मरणिका, १९७०

२. महाराष्ट्र सरकार - महाराष्ट्र स्टेट गॅझेट सातारा जिल्हा, पृ. ८०५.

३. ढवळे ना.वा. दै. सकाळ लेख कात्रण, दि. ९ ऑक्टोबर, १९९२.

४. मैदानी व मर्दानी सामना समिती, कराड रौप्य महोत्सव स्मरणिका, १९७०.

५. महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्र स्टेट गॅझेट, सातारा जिल्हा, पृ. ८०५.

६. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ.१.

७. मैदानी व मर्दानी सामना समिती, कराड रौप्य महोत्सव स्मरणिका, १९७०.

८. गुप्ते य.रा. - कराड, पृ. १ ते ३.

९. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. २-३१.

१०. डॉ. देव एस.बी., महाराष्ट्रातील उत्खन्ने, पृ. १८-१९.

११. डॉ. खणे बी.डी.- लेख - प्राचीन कराड, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद पत्रिका, फेब्रुवारी १९९६.

१२. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. ४.

१३. गुप्ते य. रा. - कराड, पृ. ४.

१४. डॉ. देव एस. बी. - महाराष्ट्रातील उत्खनने, पृ. ६१.

१५. कित्ता, पृ. ८५.

१६. कित्ता, पृ. ६७.

१७. डॉ. खणे बी.डी.- लेख - प्राचीन कराड, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद पत्रिका, फेब्रुवारी, १९९६.

१८. महाराष्ट्र सरकार स्टेट गॅझेट, सातारा जिल्हा, पृ. ५.

१९. डॉ. गोखले बी.जी. बुध्दीजम इन महाराष्ट्र ए हिस्ट्री, मुंबई (१९७६), पृ.९८.

२०. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. ७.

२१. गुप्ते य. रा. - कराड, पृ. २७.

२२. कित्ता, पृ. २७.

२३. कित्ता, पृ. २९.

२४. कित्ता, पृ. ३१ ते ३४.

२५. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. ९.

२६. डॉ. खणे बी.डी.- लेख - प्राचीन कराड, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद पत्रिका, फेब्रुवारी, १९९६.

२७. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. ९.

२८. ढवळे ना. वा. - दैनिक सकाळ, लेख कात्रण, दि. १८.९.१९९२.

२९. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. १२.

३०. ढवळे ना. वा., दैनिक सकाळ लेख कात्रण, १८.९.१९९२.

३१. कित्ता, दि. १९.९.१९९२

३२. पाटील पी.डी. - संपादक, कराड नगरपालिका, शतसांवत्सरिक स्मृति ग्रंथ, १८५५ ते १९५५, पृ. १०-११.

३३. महाराष्ट्र स्टेट गॅझीटीअर, सातारा, पृ. १.